Volume - 6 (2025)
Special Issue - 1 (March)

RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal

ISSN
2582-9173

Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# महिला सक्षमीकरणात महिला बचत गटाचे योगदान

संशोधक विध्यार्थी
**जितेंद्र मधुकर पेटकर**
P.G.T.D.राज्यशात्र विभाग
R.T.M.नागपुर विध्यापिठ, नागपुर
Email - Petkarjm2011@gmail.com

मार्गदर्शक
**डॉ. विनोद मारोतराव मुडे**
सहायक प्राधापक, श्रीसाईबाबा लोक प्रबोधन
कला महाविद्यालय , वडनेर ,वर्धा

---

**प्रस्तावना :**

आजच्या काळात महिला सक्षमीकरण हा चर्चेचा विषय बनला आहे. खासकरून मागासवर्गीय व प्रगतिशील देशामध्ये महिला सक्षमीकरणवर जास्त भर दिल्या जात आहे. कारण आज प्रत्येकाला कळून चुकले आहेत की देशातील स्त्रियांच्या प्रगतीशिवाय देशाची प्रगत शक्य नाही. आपल्या प्राचीन ग्रंथामध्ये "यत्र नार्यस्त्यु पूज्यन्ते रमन्त्ये तत्र देवता" अर्थात जेथे नारीची (स्त्रिची) पुजा केली जाते तेथे देवाचे स्थान असते अशा पद्धतीने स्त्रियांना मानसन्मान दिल्या जाते .

महिला सक्षमीकरण म्हणजे सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व शैक्षणिकदृष्या महिला शक्तिमान होणे होय . महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांच्या अंगभूत क्षमतांचा विधायक विकास होणे होय . स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने निर्णय प्रकियेत व सामाजिक,राजकीय आर्थिक व सांस्कृतिक व्यवस्थेत समान स्वरूपाची संधि ,स्थान ,लाभ व प्रतिष्ठा मिळाली पाहिजेत , जनमत ,लैंगिकता श्रमावर तसेच विचारावर फक्त पुरूषांचे वर्चस्व न राहता स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने स्थान मिळणे आवश्यक आहेत. या सारख्या विचारास महिला सक्षमीकरणाचा पाया मानतात . महिला सक्षमीकरण ही एक दीर्घकाळ व निरंतर चालणारी प्रकिया आहेत .परंतु आज महिला म्हटले की महिला बचत गट ही ओळख डोळ्यासमोर उभी राहते ,म्हणूनच महिला बचत गट संदर्भात शासनाच्या वेगवेगळया योजना यांचा उल्लेख करणे महत्वाचे आहेत .

सध्या महाराष्ट्र मध्ये बचत गटातील महिलांच्या प्रगति ,उन्नती व उपजीविका साठी उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोनती अभियान ( MSRLM) हे मिशन काम करताना दिसत आहेत , त्यासोबतच माविम ,नाबार्ड ,सारख्या वेगवेगळ्या संस्था काम करत आहेत परंतु उमेद मिशन सध्या मोठ्या स्वरुपात काम करीत आहेत आणि उमेद अभियान महिला सक्षमीकरण मध्ये मोठी भूमिका बजावत आहेत ,हे मिशन ग्रामीण विकास मंत्रालय महाराष्ट्र मार्फत राबविल्या जात आहेत ,

स्वयंसहायता बचत गट ही संकल्पना प्रा . मोहमद युनूस यांनी बांगलादेश या देशात सुरू केली , बांगलादेशातील अत्यंत हलाकीचे जीवन जगणाऱ्या लोकांना संजीवनी देण्याचे काम या बचत गटाच्या माध्यमातून प्रा. युनूस यांनी करून दाखविले . प्रा. युनूस यांना असे आढळून आले की ,बांगलादेशातील जोबरा या गावात बांबूपासून फर्निचर तयार करण्याकरिता लागणारे बांबू व इतर साहित्य विकत घेण्याकरिता लोकाजवळ पुरेसे पैसे नव्हते . त्याकरिता त्यांना सावकाराकडून कर्ज घ्यावे लागत असे व त्यांनी मिळविलेल्या या व्यवसायातून प्राप्त

केलेल्या उत्पन्नाचा फार मोठा भाग सावकार यांना द्यावा लागत असे ,म्हणून प्रा युनुस यांनी गरीब लोकांना मदत करण्यासाठी बचत गटाची स्थापणा केली व त्यातून गरजू लोकांना कर्जपुरवठा करता येईल व त्यामधून हे लोक कर्जाची परतफेड करतील व स्वयंपूर्ण होतील, या उद्देशाने त्यांनी 1977 मध्ये ग्रामिण बँक स्थापणा केली . अशाप्रकारे स्वयंसहायता बचत गटाची संकल्पना जगभर मान्य झाली.

**बचत गट म्हणजे काय ? :**

आपल्या सभासदाला अडीअडचणीच्या वेळी आणि त्यांनी केलेल्या बचत मधून एकमेकांना आर्थिक साहाय्य करणे , आपली अर्थिक परिस्थिति उन्नत करण्यासाठी स्वताचे भांडवल तयार करणे . माहीलामध्ये आत्मविशास निर्माण करणे व संघटिकपणे कार्य करणे म्हणजे बचत गट किवा स्वयंसहायता समूह होय .

**महिला सबलीकरण** :

सबलीकरण ही एक अशी प्रकिया आहेत की ज्यामुळे महिलांना स्वतची ओळख पटेल व त्यांचे सर्व क्षेत्रातील महत्वपूर्ण स्थान त्यांना माहिती होईल . सक्षम महिलांची एक सकारात्मक स्वप्रतिमा तयार होईल व स्वतसंबधी ,कुटुंबासंबधी आणि राष्ट्रासंबधि निर्णय घेण्यावर देखील नियंत्रण ठेवता येईल .

महिला सबलिकरणाची संकल्पना 1985 मध्ये नैरोबी येथील जागतिक महिला परिषदेमध्ये उदयास आली . महणून UNO संघटनेने 1985 हे आंतर्राष्ट्रीय महिला वर्ष म्हणून पाळण्यात येते . या दशकात संयुक्त राष्ट्र संघटनेने सर्व देशांना महिलांच्या स्थितीवर अहवाल मागितला . याविषयी भारत सरकारने एक समिति स्थापण केली होती . या अहवालनुसार भारताने नॅशनल प्लान ऑफ ॲक्शन फॉर वुमेन्स असा प्रारूप आराखडा तयार केला आणि त्यांनतर भारतात महिला सबलीकरणाची दिशा निश्यित झाली . आणि भारतामध्ये महिलासाठी बचत गटाच्या माध्यमातून गंगा कल्याण , स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजना SGSY , आणि आता संपूर्ण भारतात NRLM ( राष्ट्रीय ग्रामीण जीवन्नोणती अभियान ) हे मिशन सुरू आहेत . प्रत्येक राज्यात वेगवेगळया नावाने हे मिशन काम करीत आहेत ,

**MSRLM उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोणती अभियान :**

महाराष्ट्र मध्ये MSRLM उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोणती अभियान या नावाने हे मिशन काम करीत आहेत , ग्रामीण विकास मंत्रालय मार्फत जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद व तालुका स्तरावर पंचायत समिति कामकाज पाहत आहेत , गाव स्तरावर महिलाचे बचत गट तयार करने आणि मोठ्या गावात 10 ते 20 गट एकत्र करून त्यांचे ग्रामसंघ ( VO) तयार करून आणि प्रभाग स्तरावर प्रभागसंघ ( CLF ) तयार केले जातात आणि बचत गटाचे काम वरील यंत्रणेद्वारे पूर्ण केले जाते ,बचत गटातील महिलांना वेगवेगळया ॲक्टिविटी मध्ये मदत करणेसाठी समूह संसाधन व्यक्ति ज्याला CRP म्हणतात ते काम करतात यासाठी त्यांना मानधन दिल्या जाते ,उदा . कृषिसंबधि माहिती देण्यासाठी कृषिसखी , जनावरे व पशूबाबत पशुसखी , महिलाच्या उद्धयोग साठी उद्धयोगसखी , बँकेचे कामासाठी बँकसखी , कृतिसंगम सखी , गटाचे मीटिंग व्यवस्थित झाली पाहिजेत म्हणून प्रेरिका ,लेखे लिहिण्यासाठी लेखापाल असे वेगवेगळे Caders ज्यांना समूह संसाधन व्यक्ति असे सुद्धा म्हणतात.

म्हणून बचत गटातील महिलांचा महिला सबलीकरण मध्ये महत्वाचा वाटा आहेत.

आज बचत गटातिल महिलाना बँक मार्फत व ग्रामसंघ मार्फत व शासकीय योजना मार्फत कर्ज घेऊन आपली उपजीविका वाढविण्या मध्ये मोलाची भूमिका बचत गटातिल महिला करताना दिसत आहेत , बचत गटातील महिला बँकतून कर्ज घेऊन आपला व्यवसाय उभा करतात ,त्यांना बँकेचे कर्ज परवडतात कारण उमेद मिशन मार्फत त्यांना interest subvention व्याजावर सबसिडी मिळतात , आज बचत गटातील महिला फक्त गटाचे कर्ज व मीटिंग एवढयवरच अवलंबून न राहता आपला व्यवसाय करून आपली स्वतची ओळख निर्माण केली ,सोबतच महिला गटातील सामूहिक शक्ति मुळे स्थानिक स्वराज संस्था मधील राजकरणावर फारसा प्रभाव पडलेला दिसतो . स्थानिक नेते बचत गटातील महिला किवा ज्या समूह संसाधन व्यक्ति म्हणून काम करतात त्यांना आपल्या पक्षामार्फत निवडणुकीला उभे करतात व उमेदवारी देऊन मानसन्मान दिल्या जातो , हे सुध्या महिला सक्षमीकरणचा एक भाग आहेत , म्हणूनच महिला बचत गटाचा महिला सबलीकरणवर प्रभाव पडलेला दिसून येतो .

**महिला सबलीकरणाचे उद्दिष्टे :**

1) अशी वातावरण निर्मिती करणे की ज्यामुळे सकारात्मक आर्थिक धोरणाद्वारे महिलांचा पुर्णपणे विकास होईल व त्यांना त्यांच्या क्षमतांची जाणीव येवू शकेल

2) पुरुषप्रमाणे महिला देखील सर्व क्षेत्रामध्ये आर्थिक ,सामाजिक .राजकीय संस्कृतिक , नागरिकत्व ,समान हक्क व मूलभूत स्वातंत्र उपभोगता येईल .

3) आरोग्यसेवा, सर्व पातळीवर शिक्षण ,व्यवसाय विषयक मार्गदर्शन ,नोकरी ,समान वेतन ,व्यवसायिक ,सामाजिक सुरक्षितता ,एत्यादी बाबतीत महिलाना संधि मिळेल .

4) राष्ट्राच्या सामाजिक ,राजकीय व आर्थिक निर्णयामध्ये महिलाना पुरुषाच्या बरोबरीने सहभाग घेण्याची संधि मिळेल .

5) महिला व मुलीबाबतचा हिंसाचार दूर करणे व स्त्री –पुरुष भेदभाव काढून टाकणे , महिला संघटना बरोबरीचे भागीदारी वादविणे .

6) महिला विषयीचे भेदभाव दूर करण्याकरिता कायदेविषयक पद्धती बळकट करणे .

**स्वयंसहायता समूह व भारत सरकारची भूमिका :**

स्वयंसहायता गटातून महिलांची यशस्वी वाटचाल सुरू झाली आहेत .बचत गटाची स्थापना हा महिलांच्या सबलीकरणाचा आणि सक्षमिकरणाच्या वाटचालीतील एक महत्वाचा टप्पा आहेत .त्यामुळे केवळ बचत करणे व कर्ज वाटणे एवढायपूरतीच या कार्याची व्याप्ती न राहता बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे विविध सामाजिक प्रश्न , विविध विषय ,याबाबत चर्चा करणे व त्यासाठी बचत गटामार्फत सामुहिकपणे काही कृती करणे ,याचाही विचार केल्या जातो , बचत गटाच्या माध्यमातून महिला स्वावलंबी बनत आहेत ,त्यांच्यातील निर्मितीक्षमतेचा विकास या माध्यमातून होत आहेत , यातून त्यांना मान व आत्मसन्मान प्राप्त होत आहे

महिला स्वयंसहायता समूह गरीबी निर्मूलना मध्ये हातभार लावत आहेत ग्रामपंचायत मध्ये तयार होणारा GPDP गाव गरीबी निर्मूलन आराखडा बचत गटाच्या माध्यमातून पूर्ण तयार केला जातो . महिला स्वयंसहायता समूह चळवळ आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी असली तरी महिलांच्या व्यक्तिक ,सामाजिक ,आरोग्य विषयक प्रश्नांची सोडवणूक देखील या मध्यामातून होत आहेत . स्त्रीने स्वतच्या क्षमतांची ओळख करून त्या क्षमताचा विकास करण्यासाठी घरगुती व सामाजिक निर्णयाच्या प्रकियेत सहभागी होऊन आत्मनिर्भयतेने व आत्मविश्वासाने काम करणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय .वर्तन ,कौशल्य ,अभिव्यक्ती व जमाखर्चाचा ताळेबंध जोपर्यंत महिला करू शकणार नाही तोपर्यंत महिलांची उन्नती व सक्षमीकरण अशक्य आहे . याच धर्तीवर महिला स्वयं सहायता बचत गट या उमेद अभियानाची वाटचाल 2011 पासून महाराष्ट्र सरकारने सुरू केली आणि हे अभियान स्त्रियांच्या विकासाला वाटचाल देणारे ठरले .

**महिला बचत गट व स्त्रियांची उद्धयोजकता :**

महिला उद्धयोजकतेच्या बाबतीत जन्मताच उध्योगिनी असतात. कारण त्यांच्या घरातील पिढ्यान पिढ्या चालणाऱ्या व्यवसायचे बाळकडू त्यांना मिळालेले असतात ,तरीपण सरकार महिला बचत गटाच्या महिलासाठी उध्योग करण्यासाठी वेगवेगळया योजना काढत असतात व त्यांचा फायदा बचत गटातील महिलाना होताना दिसून येतो . आणि आज तर ऑनलाइन च्या माध्यमातून बचत गटाच्या वस्तु विकल्या जातात , Amazon, flikpart,एत्यादी ऑनलाइनच्या माध्यमातून विक्री केल्या जाते . वर्धा जिल्हामध्ये वर्धा जिल्हातील बचत गटांनी तयार केलेल्या वस्तु विक्री साठी वर्धिणी विक्री केंद्र उभारले आहेत ,त्यामाध्यमातुन जिल्हातील सर्व बचत गट आपले उत्पादने विक्री साठी वर्धिणी शॉप मध्ये ठेवतात. हा महिला सबलीकरणाचा एक भाग आहेत महणूच बचत गटाचा महिला सबलीकरणावर प्रभाव पडलेला दिसतो ,कारण महिला आता कोणावर अवलंबून न राहता स्वतची उपजीविका तयार करायला शिकल्या हे सर्व बचत गटातील महिला एकीमुळे व शासनाच्या चांगल्या धोरणामुळे शक्य झाले .

**बचत गटासाठी केंद्र शासन व राज्य सरकारच्या योजना :**

- मुद्रा योजना
- महिला उध्योग निधि योजना
- PMFME( प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रकिया उध्योग योजना
- CMEGP ( मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम )
- PMEGP ( प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम )
- DDUGKY( दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना )
- R-SETY ( स्टार स्वरोजगार प्रशिक्षण संस्था )
- महिला समृद्धि कर्ज योजना

अशा प्रकारे बचत गटातील महिलासाठी सरकारने विविध योजना तयार केले आहेत , आणि त्या

योजनाचा लाभ बचत गटातील महिलांनी घेऊन आपली व कुटुंबाची उपजीविका निर्माण केली आहेत .

**निष्कर्ष :**

स्वयं सहायता बचत गट स्थापन केल्यामुळे ग्रामीण भागातील दरिद्र रेषेखालील कुटुंबाचा विचार करणे गरजेचे होते . ग्रामीण भागातील महिला कार्यक्षम असूनही त्या चूल आणि मूल या पलीकडे कोणतेही कार्य करीत नाही , ही खंत होती . शेती ,जनावरे सांभाळणे , मुलांचे संगोपन करणे ही कार्य ग्रामीण भागातील महिलापूरतीच मर्यादित होती .

आर्थिकद्रुष्टा दुर्बल व ग्रामीण माहीलामध्ये गरीबी व उत्पादन साधनाचा अभाव या जोडीत शेती सोडून एतर कोणताही व्यवसाय करण्याचे कौशल्य नाही . बाजारपेठेचा अभाव , पिढ्यांनपिढ्या चालत आलेली सामाजिक बंधने त्यामुळे एकट्या महिलेने व्यवसाय करणे कीबहुना सामाजात मोकळेपणाने वावरणे ह्या सर्व बाबी विचारात घ्यावा लागतात . भारतातील सामाजिक चालीरीती ,रूढी व परांपरामुळे ग्रामीण महिलाना विकासामध्ये महत्व दिले गेले नाही आणि त्यांना स्वयंविकासाची संधि दिली गेली नाही .

परंतु बचतगटामुळे महिलांचा आर्थिक सामाजिक व राजकीय विकासात चालना मिळत आहेत . जागतिकीकरणाच्या या युगात महिलांच्या संदर्भात असणारी चूल आणि मूल ही संकल्पना कालबद्ध झाली आहेत . “जिच्या हाती पाळणाची दोरी ,ती जगाची उदधारी “ तर आता महिलांच्या हातामध्ये आर्थिक विकासाची नाडी आली आहेत . बचत गट चळवळ ही खऱ्या अर्थाने स्त्री उद्धारची व देशोन्नती ची चळवळ झाली आहेत . ज्यामुळे जगतिकीकरणाचा काळात गरीब , ग्रामीण , कष्ट्यकरी महिलांच्या सहकारातून पुढे आलेली ही बचत गटाची चळवळ ही आता गरीब भारतीय समाजाच्या आशेचा किरण ठरत आहेत . बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे नेतृत्व उभे आहेत व येणारा काळ हा महिला नेतृत्वाचा आहे.

**संदर्भ :**


- यशोगाथा – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोणती अभियान –ग्रामीण विकास मंत्रालय , मुंबई .
- “पंखाना एकीचे बळ “ दैनिक लोकसत्ता , 8 मार्च 2014
- मुलानि एम . यु – महिला स्वयं सहाय्यता बचत गट , डायमंड प्रकाशन , पुणे
- ‘उधयोगाच्या दिशेने” दैनिक लोकसत्ता , एप्रिल 2015
- डॉ. दीपक पवार , महिलांचे राजकीय सक्षमीकरण 2013 , साईनाथ प्रकाशन ,नागपुर
- बचत गटासाठी कार्यक्षम व्यवस्थापन प्रशिक्षण पुस्तिका , ज्ञान प्रबोधिनी , पुणे .
- जे. बी. कुलकर्णी – बचत गट – सूक्ष्म वित्तपुरवठा
- संपादक डॉ. सुनील शिंदे – महिला बचत गटाचे विविध पैलू , आकार पब्लिकेशन नागपुर
- Self Help Groups & Womens Development, Tripti kumari , Anand Prasad Mishra.